सोबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे "राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत..." या विषयाचे शासन परिपत्रक क्रमांक याचिका-२२१२/(प्र.क्र.७९/२०१४/समन्वय, दिनांक ८.१२.२०१४ ची प्रत सोबत जोडत आहे)

---

क्रमांक : १६/संकीर्ण/२०१४/शा३३९८६
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

दिनांक : - 3 JAN 2015

प्रति,

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

२) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व संस्था / कार्यालये प्रमुखांच्या निदर्शनास आणावे.

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक, तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

०७/१/१५

प्रत :- कार्यासन क्रमांक १२ मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

क्रमांक : विभाशि/ आस्था/ रा.ध्वा.परिपत्रक/2015/

दिनांक :- १२/१/२०१५

प्रतिलिपी,
प्राचार्य, शा. अभि. महा. अमरावती / शा. तं. महा., अमरावती
शा. शिवाजी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ
प्राचार्य, शा. तंत्रनिकेतन, अमरावती / यवतमाळ / खामगांव / वाशिम / मुर्तिजापूर यांना माहितीकरिता.

सहपत्र : महाराष्ट्र शासन परिपत्रक

सहसंचालक
तंत्र शिक्षण, अमरावती.

राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत......

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः याचिका-२२१२/(प्र.क्र.७९/२०१४)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
तारीखः ०८ डिसेंबर, २०१४.

वाचा :-

शासन परिपत्रक क्रमांकः याचिका-२२१२/(प्र.क्र.७९/२०१४)/समन्वय, दि.२३ सप्टेंबर, २०१४.

शासन परिपत्रक -

जनहित याचिका क्र.१०३/२०११ ( हिंदू जनजागृती समिती विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर/ राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत) संदर्भात दि.२९/०९/२०१४ रोजी सुनावणी झाली असून, त्यामध्ये राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत जनजागृती करण्याबाबत तसेच खराब झालेल्या /फाटलेल्या राष्ट्रध्वजांची विल्हेवाट ध्वजसंहितेतील तरतूदीनुसार लावण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने निदेश दिले आहेत.

२. जनहित याचिका क्र.१०३/२०११ संदर्भातील दि.२९/०९/२०१४ रोजीच्या आदेशानुषंगाने खालील बाबींचे तंतोतत पालन करण्याबाबत दक्षता घेण्यात यावी. :-

१) ) ध्वजसंहितेतील तरतूदी बंधनकारक असून प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाचा वापर विद्यार्थ्यांनी करु नये याबाबत मान्यताप्राप्त शाळा व महाविद्यालयांनी तसेच सर्व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांनी खात्री करण्याच्या सूचना सर्व संबंधित संस्थांना देण्यात याव्यात.

२) ध्वजसंहितेतील तरतूदीनुसार फक्त कागदापासून बनविलेले ध्वज वापरण्यात यावेत.

३) ध्वजसंहितेतील नियम २.२ मधील उप नियम ( एक्स ) नुसार सर्व शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, स्थानिक प्राधिकरणे आणि शैक्षणिक संस्थांनी कागदी तथा प्लास्टिक ध्वज गोळा करणे व विल्हेवाट लावणे याबाबत जिल्हा आणि तालुका स्तरावर असलेल्या सुविधांबाबत माहिती करुन घेण्यात यावी.

४) सदर परिपत्रकास जाहिर प्रसिद्धी देण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४१२०८१४५२१८७२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

का.रा.पिळणकर
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

पत्र प्राप्त झाले
10 2014
तंत्र शिक्षण संचालनालय
मार्ग, मुंबई १.